वाचा :- १) महाराष्ट्र शासन,ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासान निर्णय क्र.ग्रासयो-२०११/प्र.क्र.२६/यो ९/मंत्रालय मुंबई, दिनांक ११ एप्रिल २०११

२) महाराष्ट्र शासन,ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासान निर्णय क्र.संग्राम २०१४/ प्र.क्र.१२७/ संग्राम कक्ष, मंत्रालय मुंबई, दिनांक २० ऑगस्ट २०१४

३) कार्यालयीन मंजुर टिपणी दिनांक १८ /०५/२०१८

---

नाशिक जिल्हा परिषद, नाशिक
जा.क्र.साप्रवि/आस्था-३/ २३७६/२०१८
नाशिक,दिनांक १८ /०५/२०१८

**आदेश**

पंचायत राज संस्थेचे कामकाज लोकाभिमुख,पारदर्शक व कार्यक्षम करण्यासाठी,माहिती व तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करुन जलद गतीने माहिती उपलब्ध करुन देणे, उपलब्ध माहितीच्या आधारे विकास कामांचे नियोजन व परिणामकारक अंमलबजावणी,देखरेख,माहितीचे विविध प्रशासकिय विभागांमध्ये आदान-प्रदान व विविध प्रणालीचा परिणामकारक वापर व ई-गव्हर्नन्सच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषद स्तरावर मध्यवर्ती ई-निविदा कक्ष (e-tender Cell ) स्थापन करण्याबाबत शासनाचे निर्देश आहेत.

महाराष्ट्र शासन,ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासान निर्णय क्र.संग्राम २०१४/ प्र.क्र.१२७/संग्राम कक्ष, मंत्रालय मुंबई,दिनांक २० ऑगस्ट २०१४ नुसार जिल्हा परिषद स्तरावर मध्यवर्ती माहिती व तंत्रज्ञान कक्ष स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. मध्यवर्ती माहिती व तंत्रज्ञान कक्षाचाच एक भाग म्हणुन मध्यवर्ती ई-निविदा कक्ष (e-tender Cell ) जिल्हा परिषदेत सर्व विभागाच्या ई-निविदा अपलोड करण्याचे काम करील. महाराष्ट्र शासन,ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासान निर्णय क्र.ग्रासयो-२०११/प्र.क्र.२६/यो ९/मंत्रालय मुंबई, दिनांक ११ एप्रिल २०११ नुसार कामवाटप समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

जिल्हा परिषद नाशिक स्तरावर मध्यवर्ती ई-निविदा कक्ष (e-tender Cell ) नियंत्रण समिती खालीलप्रमाणे स्थापन करण्यात येत आहे-

| | | |
|---|---|---|
| १) मुख्य कार्यकारी अधिकारी | - | अध्यक्ष |
| २) अति.मुख्य कार्यकारी अधिकारी | - | सनियंत्रक तथा सहअध्यक्ष |
| ३) मुख्य लेखा व वित्त अधिकारी | - | सदस्य |
| ४) महिला व बाल विकास अधिकारी | - | सदस्य |
| ५) कार्यकारी अभियंता,इवद १/२ | - | सदस्य |
| ६) कार्यकारी अभियंता,ग्रापापु/लपा (पु /प.) | - | सदस्य |
| ७) जिल्हा आरोग्य अधिकारी | - | सदस्य |
| ८) कृषि विकास अधिकारी | - | सदस्य |
| ९) जिल्हा समाजकल्याण अधिकारी | - | सदस्य |
| १०) संबधित विभागाचे खाते प्रमुख | - | सदस्य |
| ११) कार्यकारी अभियंता,इवद क्रमांक-३ | - | सदस्य सचिव |

सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करणेत यावी.

सदर आदेश http://zpnashik.maharashtra.gov.in या जिल्हा परिषदेचे संकेतस्थळावर उपलब्ध करणेत आला आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

प्रति,

उक्त सर्व संबंधित-

प्रत :- मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद नाशिक यांचे वैयक्तिक कार्यालयास
प्रत :- अति.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद नाशिक यांचे वैयक्तिक कार्यालयास
प्रत :- विभाग प्रमुख------------(सर्व),जिल्हा परिषद नाशिक
प्रत :- जिल्हा परिषद नाशिक मध्यवर्ती माहिती व तंत्रज्ञान कक्ष (IT CELL)
प्रत :- कार्यालयीन प्रत / ज्ञापन नस्ती

Scanned by CamScanner